# दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

*जीवन करा समृद्ध!*

**मुख्य कार्यालय: 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, आय. सी. एस. कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००७. फोन: ०२०-६७०८ ६७०८**

## सभासदांकरीता जाहीर नोटीस

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. ही बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ अंतर्गत नोंदविली असून बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ अन्वये रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग परवान्यानुसार बँकिंग व्यवसाय करीत आहे.

बँकेचे कार्यक्षेत्र देशातील ७ राज्यात असून १७० शाखांमार्फत बँकिंग व्यवसाय केला जात आहे. बँकेचा व्यवसाय बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९, बहुराज्य सहकारी संस्था अधिनियम २००२ व त्या अंतर्गतचे नियम तसेच केंद्रीय निबंधकाने मंजूर केलेल्या पोटनियमांप्रमाणे चालतो.

बँकेच्या पोटनियम क्र. २८ (iv) मधील तरतुदीनुसार थकबाकीदारास बँकेची निवडणूक तसेच विशेष सर्वसाधारण सभेत मतदानाचा अधिकार असणार नाही. बँकेच्या सध्याच्या संचालक मंडळाची पाच वर्षांची मुदत डिसेंबर २०२४ मध्ये पूर्ण होत असल्याकारणाने संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी रविवार दि. १५ डिसेंबर २०२४ रोजी पुणे शहरात विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यात येणार आहे. सबब, सर्व थकबाकीदारांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आपणाकडे असलेल्या थकबाकीची संपूर्ण रक्कम तात्काळ भरणा करून निवडणुकीत/ विशेष सर्वसाधारण सभेत मतदानाचा अमूल्य हक्क प्राप्त करून घेऊन तो वापरावा अशी विनंती आहे. थकबाकीदारांना थकबाकी भरणेबाबत स्वतंत्र नोटीसा दिलेल्या आहेतच, परंतु काही कारणास्तव नोटीस मिळाली नसल्यास थकबाकीची संपूर्ण रक्कम भरून मतदानाचा हक्क कायम ठेवण्याच्या दृष्टीने ही अंतिम नोटीस देण्यात येत आहे.

सहकारी निवडणूक प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार मतदारांची यादी शुक्रवार दि. २२ नोव्हेंबर २०२४ रोजी जाहीर होणार आहे. तसेच मतदार यादीबद्दल हरकती नोंदविण्यासाठीची मुदत शनिवार दि. २३ नोव्हेंबर २०२४ ते मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४ अशी राहील. आपण आपल्या संपूर्ण थकबाकीचा भरणा (वैयक्तिक तसेच जामिन बोजा विषयीचा) मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत केल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे याबाबतचा तपशिल बँकेतर्फे कळविण्यात येईल, ज्यायोगे आपणास निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क प्राप्त होईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**स्थळ :** पुणे

**दिनांक :** १३ नोव्हेंबर २०२४

**सौ. अपेक्षिता ठिपसे**

**व्यवस्थापकीय संचालिका**